# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः27.02.2025** **वारःगुरुवार**

---

- जगातील सर्वात मोठ्या अध्यात्मिक मेळाव्याची प्रयागराज इथं सांगता. 66 कोटींहून अधिक भाविकांनी साधली स्नानपर्वणी,
- नौदल जहाजविरोधी क्षेपणास्त्राची उड्डाण चाचणी यशस्वी,
- युरोपिय आयोगाच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डर लेयन आजपासून दोन दिवसांच्या भारत दौऱ्यावर,
- युक्रेन आणि अमेरिकेदरम्यान खनिज भागीदारी करार आणि संरक्षणाची हमी यासाठी चर्चा,
- इथेनॉल मिश्रणाचं ध्येय वीस टक्क्यांवर नेण्याचा भारताचा विचार, आणि,
- चँपियन्स करंडक स्पर्धेत अफगाणिस्तानची इंग्लंडवर 8 धावांनी मात

**<u>महाकुंभ-छसंनगरप्रा</u>**

उत्तरप्रदेशात प्रयागराज इथं महाकुंभ मेळा काल समाप्त झाला. मकर संक्रांतीपासून सुरू झालेल्या या महाकुंभामध्ये 66 कोटींहून अधिक भाविकांनी पवित्र संगमावर स्नान केलं. भारतीय वायु दलानं घाटांवर पुष्पवृष्टि करुन भाविकांना संस्मरणीय आनंद दिला. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी सर्व भाविक, संत आणि कल्पवासी यांना शुभेच्छा दिल्या.
भाविकांनी संपूर्ण जगाला राष्ट्रीय एकता आणि समर्पणाचा संदेश दिला असल्याचं ते म्हणाले. महाकुंभ 2025 हा इतिहासातील अध्यात्मिकता आणि मानवी संमेलनाचं एक सर्वात मोठं केंद्र ठरला.

महाकुंभ पर्वात देशाचे सांस्कृतिक बंध दृढ करण्यात प्रसारभारतीनं महत्त्वाची भूमिका बजावली असल्याचं प्रसार भारतीचे अध्यक्ष नवनीत सेहगल यांनी म्हटलं आहे. या पर्वाचे सर्व 48 दिवस चाललेल्या कुंभवाणी वाहिनीमार्फत आकाशवाणीने कोट्यवधी लोकांशी संपर्क साधला. देशाची सार्वजनिक प्रसारण व्यवस्था म्हणून आकाशवाणीनं या उत्सवात चोख कामगिरी बजावली असं प्रसार भारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी यांनी सांगितलं तर कुंभवाणीमार्फत कमीतकमी वेळात अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचण्याच्या आकाशवाणीच्या कामगिरीबद्दल महासंचालक प्रज्ञा पालिवाल - गौर यांनीही प्रशंसा केली आहे.

**<u>डीआरडीओ</u>**

संरक्षण संशोधन आणि विकास संघटना आणि भारतीय नौदलानं ओडिशातील चांदीपूर इथल्या एकात्मिक चाचणी केंद्रावरून पहिल्याच नौदल जहाजविरोधी क्षेपणास्त्राची यशस्वीरित्या उड्डाण चाचणी घेतली. या चाचण्यांमधून भारतीय नौदलाच्या सीकिंग हेलिकॉप्टरमधून जहाजावर क्षेपणास्त्र टाकण्याची क्षमता सिद्ध झाली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी यशस्वी उड्डाण चाचण्यांसाठी DRDO, भारतीय नौदल आणि उद्योगांचं अभिनंदन केलं. या चाचण्यांमुळं क्षेपणास्त्राचे मॅन-इन-लूप वैशिष्ट्य सिद्ध झाल्याचं संरक्षण मंत्रालयानं एका निवेदनात म्हटलं आहे.

**<u>राष्ट्रपती</u>**

गुजरातच्या चार दिवसांच्या दौऱ्यावर असलेल्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज सकाळी स्टॅच्यू ऑफ युनिटीला भेट देतील आणि सरदार वल्लभभाई पटेल यांना पुष्पांजली अर्पण करतील. या स्मारक परिसरातील प्रमुख आकर्षण केंद्रं तसंच एकता नगर परिसराला त्या भेट देतील. गुजरात दौऱ्यादरम्यान, राष्ट्रपती अहमदाबाद आणि गांधीनगर इथल्या दोन दीक्षांत समारंभांना उपस्थित राहणार आहेत आणि कच्छ जिल्ह्यातील काही ठिकाणांना भेट देणार आहेत. अहमदाबादमधील राष्ट्रीय डिझाइन संस्थेच्या 44 व्या तसंच गांधीनगर इथल्या राष्ट्रीय न्यायवैद्यक विज्ञान विद्यापीठाच्या तिसऱ्या दीक्षांत समारंभाला राष्ट्रपती उपस्थित राहतील. दौऱ्याच्या अखेरीस त्या धोलावीरा या युनेस्को जागतिक वारसा स्थळाला भेट देतील.

**<u>दिल्ली विधानसभा</u>**

दिल्ली विधानसभेच्या उपसभापती पदासाठी आज निवडणूक होणार आहे. दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता भाजप आमदार मोहन सिंग बिष्ट यांचं नाव  उपसभापती पदासाठी सुचविणारा प्रस्ताव मांडतील. बिष्ट हे मुस्तफाबाद मतदारसंघाचे आमदार आहेत.
याशिवाय, मागील सरकारच्या मद्य धोरणाशी संबंधित कॅग अहवालावरही सभागृहात चर्चा सुरू राहील.

**<u>बिहार</u>**

बिहारमध्ये नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळात काल सात नवीन मंत्र्यांचा समावेश करण्यात आला. राज्यपाल आरिफ मोहम्मद खान यांनी भाजप कोट्यातल्या सात आमदारांना पाटणा इथं शपथ दिली.

या विस्तारामुळं, नितीश कुमार मंत्रिमंडळातील सदस्य संख्या 36 झाली आहे. बिहारमध्ये या वर्षाच्या अखेरीस विधानसभा निवडणुका होणार आहेत. पाच सदस्यांना प्रथमच मंत्रीमंडळात संधी मिळाली असून आता भाजपचे 21  तर संयुक्त जनता दलाचे 13 सदस्य आहेत. बिहारमध्ये, एनडीएचे पाच घटक पक्ष आघाडीत आहेत.

**<u>युरोपिय संघ</u>**

युरोपिय आयोगाच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डर लेयन आजपासून दोन दिवसांच्या भारत दौऱ्यावर येत आहेत. लेयन यांचा हा तिसरा भारत दौरा असून त्या आज संध्याकाळी परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांची भेट घेतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या युरोपियन आयोगाच्या अध्यक्षांसोबत शिष्टमंडळ स्तरावरील चर्चा करतील. भारत आणि युरोप 2004 पासून धोरणात्मक भागीदार आहेत आणि त्यांचे द्विपक्षीय संबंध विविध क्षेत्रात विस्तारले आणि दृढ झाले आहेत. या दौऱ्यामुळे द्विपक्षीय संबंध अधिक भक्कम होण्याचा मार्ग मोकळा होईल.

**ट्रम्प**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी, युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की उद्या व्हाईट हाऊसला भेट देतील आणि त्यांच्या देशातल्या दुर्मिळ खनिजांचा हक्क अमेरिकेला देणाऱ्या करारावर स्वाक्षरी करतील, असं जाहीर केलं आहे. युक्रेन युद्धावरही यावेळी एक करार करण्यात येईल. मंत्रिमंडळाच्या पहिल्या बैठकीत उद्घाटनपर भाषणात अध्यक्ष ट्रम्प म्हणाले की, सर्व काही निश्चित झालं असून युद्धामध्ये लोकांची हत्या थांबवण्यासाठी रशिया आणि युक्रेनसोबत आपण करार करणार आहेत. युक्रेन युद्धाचा थेट परिणाम युरोपवर होत असला, तरी त्या देशाला मदत करण्यासाठी अमेरिकेनं युरोपपेक्षा जास्त खर्च केला आहे असा दावा त्यांनी केला. अध्यक्ष ट्रम्प यांची झेलेन्स्की आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन या दोघांसोबत चर्चा झाली आहे.

दरम्यान, युक्रेनचे अध्यक्ष झेलेन्स्की यांनी सांगितलं की खनिज भागिदारी आणि संरक्षणाच्या हमीबाबत अमेरिका आणि युक्रेनची पथकं वाटाघाटींची तयारी करत आहेत.

**जयशंकर**

परराष्ट्र मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी विकसनशील देशांच्या आकांक्षा आणि हितसंबंध जागतिक स्तरावर पूर्णपणे मांडल्या जातील याची खात्री करण्याच्या गरजेवर भर दिला आहे. जपान-भारत-आफ्रिका व्यवसाय मंचाच्या बैठकीत दूरस्थ पद्धतीनं केलेल्या भाषणात, डॉ. जयशंकर म्हणाले की भारतानं व्हॉइस ऑफ द ग्लोबल साउथ समिट किंवा जी20 अध्यक्षपदाद्वारे या कारणाचं सातत्यानं समर्थन केलं आहे. भारताचा आफ्रिकेकडे पाहण्याचा दृष्टिकोन नेहमीच दीर्घकालीन आणि परस्पर फायदेशीर भागीदारी निर्माण करण्याच्या खोलवर रुजलेल्या वचनबद्धतेद्वारे प्रकट झाला असल्याचं जयशंकर म्हणाले. भारत हा आफ्रिकेचा चौथा सर्वात मोठा व्यापारी भागीदार असून हा द्विपक्षीय व्यापार १०० अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचला आहे.
पेयजल योजनांपासून ते सिंचन, ग्रामीण सौर विद्युतीकरण आणि वीज प्रकल्प अशा विविध क्षेत्रातील भारताच्या विकास प्रकल्पांमुळे आफ्रिकेत स्थानिक रोजगार निर्माण झाला आहे आणि तिथलं जनजीवन बदललं असल्याचं जयशंकर यांनी नमूद केलं.

**हरदीप पुरी**

केंद्रीय पेट्रोलियम आणि भूगर्भ वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी इथेनॉल मिश्रणाचं ध्येय 20 टक्क्यांहून अधिक वाढवण्याचा विचार सुरु असल्याचं म्हटलं आहे. गुवाहाटी इथं ॲडव्हांटेज आसाम द्वितीय गुंतवणूक

शिखर परिषदेत बोलताना त्यांनी सांगितलं की देशात 19 पूर्णांक 6 टक्के इथेनॉल मिश्रणाचा दर आधीच गाठला आहे. विकासात्मक आव्हानं असली तरी, भारतातील सर्व जीवाश्म इंधन उत्पादन कंपन्या 2045 पर्यंत शून्य उत्सर्जन साध्य करतील अशी अपेक्षा असल्याचं पुरी म्हणाले.

**भूकंप**

आसाममध्ये आज सकाळी भूकंपाचा धक्का बसला. रिख्टर स्केलवर 5 क्षमतेच्या या भूकंपाचे धक्के राज्यात सर्वत्र जाणवले.

हा सर्व भाग भूकंप प्रवण क्षेत्रात असून मंगळवारी बंगालच्या उपसागरात 5 पूर्णांक 1 क्षमतेचा धक्का बसला होता.

**निकष**

राष्ट्रीय क्रीडा महासंघांना आर्थिक मदत देण्यासाठीच्या निकषांमध्ये सुधारणा करण्यासाठी सरकारनं सहा सदस्यांची समिती स्थापन केली आहे.

युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयानं सांगितलं की, पॅरिस ऑलिंपिकनंतर, एक नवीन ऑलिंपिक चक्र सुरू झालं आहे त्यामुळं बदलती परिस्थिती लक्षात घेता निकषांचा आढावा घेण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. समिती 15 दिवसांच्या आत आपला अहवाल सादर करेल.

**क्रिकेट**

आयसीसी पुरुषांच्या चँपियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत काल लाहोर इथं अफगाणिस्ताननं इंग्लंडवर आठ धावांनी विजय मिळवला. विजयासाठी 326 धावांचं आव्हान पेलताना इंग्लंडचा संघ शेवटच्या चेंडूपर्यंत सर्वबाद 317 धावा करु शकला. अफगाणिस्तानच्या इब्राहिम झदरान यानं या स्पर्धेतील विक्रमी 177 धावा केल्या. या पराभवामुळं इंग्लंडचा संघ या स्पर्धेतून बाहेर गेला आहे. स्पर्धेत अद्याप खातं उघडू न शकलेल्या पाकिस्तान आणि बांग्लादेश यांच्यातील अंतिम गट सामना आज रावळपिंडी इथं होणार आहे.

शेवटी पुन्हा ठळक बातम्या

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.